# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 08 November 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०८ नोव्हेंबर २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- वंदे मातरम् हा एक मंत्र, एक ऊर्जा, एक स्वप्न आणि एक संकल्प– पंतप्रधानांचं प्रतिपादन
- देशभरात शैक्षणिक संस्थांसह ठिकठिकाणी वंदे मातरम् गीताचं सामुहिक गायन
- दुष्काळी भागात मनरेगाचा ६५ टक्के निधी पाणी पुरवठा योजनांसाठी–केंद्रीय कृषी मंत्र्यांची घोषणा

आणि

- भटक्या कुत्र्यांच्या नियमनासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाकडून अनेक मार्गदर्शक सूचना जारी

****

वंदे मातरम् हा एक मंत्र, एक ऊर्जा, एक स्वप्न आणि एक संकल्प असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रीय गीत वंदे मातरम् ला दीडशे वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त स्मरणोत्सवाचं उद्घाटन काल नवी दिल्लीत पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. या गीताचा भावार्थ विशद करताना पंतप्रधान म्हणाले,

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही काल या गीताचं स्मरण केलं. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या प्रतिभेतून साकारलेलं हे गीत भारतीयांना एका सूत्रात बांधून ठेवतं, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**

देशभरात ठिकठिकाणी काल वंदे मातरम् गीताचं सामुहिक गायन करण्यात आलं. मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात सामुहिक गायन पार पडलं, यावेळी मुख्यमंत्री म्हणाले..

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

छत्रपती संभाजीनगर शहरात क्रांतीचौकात वंदे मातरम गीताचं सामूहिक गायन करण्यात आलं. यावेळी दोन हजारहून जास्त विद्यार्थ्यांसह माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉक्टर भागवत कराड, मंत्री अतुल सावे, आमदार संजय केणेकर यावेळी उपस्थित होते.

जालना जिल्ह्यात भोकरदन इथल्या स्वातंत्र्य सेनानी पुंडलिक हरी दानवे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत वंदे मातरम गीत गायन उत्साहात पार पडलं. बदनापूर इथल्या पाथ्रीकर कॅम्पस मध्ये झालेल्या वंदे मातरम गायन उपक्रमात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येनं सहभाग घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातही वंदे मातरम गीताचं सामुहिक गायन झालं.

परभणी शहरात प्रियदर्शनी इंदिरा गांधी क्रीडा संकुलात सामूहिक वंदे मातरम् गीत गायन करण्यात आलं. यावेळी वंदे मातरम् लघु नाटिकाही सादर करण्यात आली. हिंगोली इथल्या जिल्हा परिषद मैदानावरही या गीताचं गायन करण्यात आलं. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर यांच्यासह शालेय विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

नांदेड शहरात श्री गुरूग्रंथ साहिबजी भवनात हजारो विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत वंदे मातरम गीत गायन करण्यात आलं. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठासह जिल्ह्यातल्या सगळ्या शाळा, महाविद्यालयं, शासकीय कार्यालयं आणि सार्वजनिक स्थळी सकाळी १० वाजता एकाच वेळी “वंदे मातरम्” गीताचे सामुहिक गायन करण्यात आलं.

बीड इथं जिल्हा क्रीडा संकुलात वंदेमातरम गीताचा सामुहिक गान कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात अनेक नागरिक सहभागी झाले.

धाराशिव इथे भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने श्री तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुलात वंदे मातरम गीताचं सामुहिक गायन करण्यात आलं. तीन हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

लातूर इथं जिल्हा क्रीडा संकुल आणि अष्टविनायक मंदिर परिसरात शेकडो विद्यार्थ्यांनी एकत्र येत सामुहिक वंदे मातरम गीत गायलं. राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'वंदे मातरम्' गीतगायन, देशभक्तिपर भाषणं, वक्तृत्व स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेतल्या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकं प्रदान करण्यात आली.

****

दुष्काळी भागात मनरेगाचा ६५ टक्के निधी पाणी पुरवठा योजनांसाठी खर्च केला जाईल, अशी घोषणा केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केली आहे. ते काल बीड जिल्ह्यात शिरसाळा इथं शेतकरी संवाद मेळाव्यात बोलत होते. शेतकऱ्यांचं उत्पन्न एवढं वाढवायचं आहे की, एकाही शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागू नये, हे आपलं उद्दीष्ट असल्याचं चौहान यांनी सांगितलं. ते म्हणाले...

**बाईट – केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान**

ग्लोबल विकास ट्रस्टनं केलेलं काम पाहिल्यानंतर शेतकऱ्यांच्या जीवनात खरोखरच आर्थिक क्रांती घडू शकते हा विश्वास वाटत असल्याचं नमूद करत, केंद्र सरकार ग्लोबल विकास ट्रस्टसोबत मिळून काम करेल, अशी ग्वाही चौहान यांनी दिली. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी यावेळी बोलताना, केंद्र सरकारनं संपूर्ण कर्जमाफी करून शेतकऱ्यांना धीर द्यावा अशी विनंती केंद्रीय कृषिमंत्र्यांना केली.

****

भटक्या कुत्र्यांच्या नियमनासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं विविध मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन.व्ही. अंजारिया यांच्या पीठानं या मुद्द्याची स्वत:हून दखल घेत, सार्वजनिक स्थळांमध्ये अशा कुत्र्यांचा प्रवेश होऊ नये, यासाठी, शैक्षणिक संस्था, रुग्णालयं, क्रीडांगणं, बस आणि रेल्वे स्थानकं यांना कुंपणं घालण्याचे निर्देश काल दिले. स्थानिक प्रशासनाकडून वेळोवेळी अशा प्राण्यांचं लसीकरण आणि निर्बीजीकरण करून त्यांच्या ठरलेल्या आश्रयस्थानांमध्ये सोडणं सुनिश्चित करण्याचे निर्देश न्यायालयानं सगळ्या राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सचिवांना दिले असून, ही कामं न झाल्यास त्याला हे अधिकारी जबाबदार राहतील, असं न्यायालयानं म्हटलं आहे.

****

आगामी स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर न करायच्या राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठानं राज्य निवडणूक आयोगाला नोटिस बजावत, पुढच्या आठवड्यापर्यंत म्हणणं मांडायचे निर्देश दिले. काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडधे यांनी ही याचिका दाखल केली आहे.

****

छप्पन्नावा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव- इफ्फी, येत्या वीस ते अठ्ठावीस तारखांदरम्यान गोव्यात पणजी इथे होणार आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी तालुक्यात डोंगरकडा इथल्या अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांशी संवाद साधला. परभणी जिल्ह्यात पिंगळी इथंही ठाकरे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधल्याचं वृत्त आहे.

****

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी आपल्या हत्येचा कट रचल्याचा आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी केला आहे. ते काल जालना जिल्ह्यात अंतरवाली सराटी इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. गाडीचा अपघात घडवून आपल्याला जीवे मारण्यासाठी अडीच कोटी रुपयांची सुपारी देण्यात आली, असा दावाही जरांगे यांनी केला.

दरम्यान, जरांगे यांच्या या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी, अशी मागणी आमदार धनंजय मुंडे यांनी केली आहे. काल परळीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत मुंडे यांनी, आपली तसंच जरांगे यांची ब्रेन टेस्ट करावी अशी मागणीही केली आहे. दरम्यान, या प्रकरणी गेवराई इथून ताब्यात घेतलेल्या दोघ संशयितांना अंबड न्यायालयाने १२ नोव्हेंबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

****

ज्येष्ठ गायिका अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांच्या पार्थिव देहवर काल मुंबईत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं गुरुवारी दीर्घ आजारानं निधन झालं. त्या ७१ वर्षांच्या होत्या.

****

नांदेड इथल्या नानक साई फाऊंडेशनची ११ वी "घुमान यात्रा" काल नांदेडला परतली. या यात्रेचं छत्रपती संभाजीनगर तसंच नांदेड इथं स्वागत करण्यात आलं.

****

धाराशिव नगर परिषदेच्या आगामी निवडणुकिसाठी सुमारे ९४ हजार १४ मतदार मतदान करणार आहेत. या मतदारांनी निर्भयपणे, कोणत्याही आमिषाला बळी न पडता मतदान करण्याचं आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांनी केलं आहे.

****

भारतीय महिला क्रिकेट संघातल्या महाराष्ट्राच्या खेळाडू स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रिग्ज आणि राधा यादव यांचा काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत सत्कार करण्यात आला. संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांच्यासह संघाच्या सपोर्ट स्टाफलाही गौरवण्यात आलं.

****

भारत–ऑस्ट्रेलिया टी २० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज होणार आहे. पाच सामन्यांच्या या मालिकेत २–१ अशा गुणफरकाने भारत आघाडीवर आहे.

****

हवामान

येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहील.

****